मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 29 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# सुलक्षणा शिलवंत यांना 'स्पर्श' अडचणीत आणणार का?

## पिंपरी विधानसभेतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सुलक्षणा शिलवंत धर यांना उमेदवारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. पिंपरी विधानसभेतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सुलक्षणा शिलवंत धर यांना उमेदवारी जाहिर झाली आहे. विद्यमान आमदार अण्णा बनसोडे विरूध्द सुलक्षणा शिलवंत धर यांची लढत होणार आहे. तुतारी गटाच्या सुलक्षणा शिलवंत यांच्यावर कोविड काळात झालेले स्पर्श प्रकरणातील आरोप अडचणीत आणतील काय? असा प्रश्न अनेकांसमोर उभारला आहे. तसेच विद्यमान आमदार यांच्या विरूध्द लढत असल्याने धर यांच्यासमोर पिंपरीचा बालेकिल्ला जिंकण्यासाठी मोठे आव्हान आहे.



मागील तीन वर्षापूर्वी म्हणजे २०२२ मध्ये कोविड १९ या विषाणजन्य आजारामुळे अनेकांचे आयुष्य पणाला लागले होते. अनेक कुटूंब उध्दवस्त झाली आहेत. मात्र या परिस्थितीचा फायदाही अनेकांनी घेतला. रूग्णांवर उपचारासाठी महापालिकेने 'स्पर्श' या संस्थेला काम दिले होते. त्यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचे आरोपही झाले. या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात पिंपरी विधानसभेच्या तुतारी गटाच्या उमेदवार सुलक्षणा शिलवंत धर यांचेही नाव घेण्यात आले होते. कोविड काळ हा प्रत्येकासाठी नाजुक काळ होता. यामध्ये अनेकांनी आपले जिवलग, नातेवाईक गमावले, त्यामध्ये असे घडल्यामुळे नागरिकांच्या मनामध्ये चीड निर्माण झाली. याचा फटका सुलक्षणा शिलवंत धर यांना बसू शकतो अशी चर्चा आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेत 2009 पासून हा मतदारसंघ अस्तित्वात आला. त्यानंतर होणारी ही चौथी विधानसभा निवडणूक आहे. आतापर्यंत दोनवेळा राष्ट्रवादी तर एकदा शिवसेनेच्या पाठिशी हा मतदार संग राहिला आहे. यंदाच्या निवडणुकीत हा मतदार संघ कोणाच्या पाठिशी राहणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### विद्यमान आमदार बनसोडेंचे आव्हान

» बनसोडे हे पिंपरी राखीव जागेवरून दोनदा निवडून आले आहेत, प्रथम 2009 आणि नंतर 2019 मध्ये. 2019 च्या निवडणुकीत त्यांनी चाबुकस्वार यांचा सुमारे 20,000 मतांनी पराभव केला होता. पिंपरी विधानसभेचा पूर्ण अभ्यास अन् तळागळातील नागरिकांपर्यंत मदतीच्या रूपाने पोहचणारा उमेदवार असल्याने शिलवंत यांच्यासमोर मोठे आव्हान आहे.

### मतदारसंघात या समस्या बिळखा

या मतदारसंघात प्रामुख्याने बाजारपेठेचा भाग येत असल्याने, पार्किंगची तोकडी संख्या, अरुंद रस्ते, त्यावर उभा राहणारे फेरीवाले, सार्वजनिक स्वच्छतागृहांची कमतरता, डीपी रस्त्यांचे रखडलेले रुंदीकरण, अतिक्रमण, काही वॉर्डात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अशा समस्या आहेत.

### मतदारांची संख्या :

- » एकूण मतदार- 3 लाख 87 हजार 973
- » पुरुष मतदार 1 लाख 85 हजार415
- » महिला मतदार- 2 लाख 2 हजार 524
- » सैनिक मतदार 975
- » तृतीयपंथी मतदार – 34 एवढी आहे.

# कोंडीच कोंडी चोहीकडे; ढिसाळ नियोजनामुळे वाहनचालकांना फटका

## बाजारपेठांबरोबरच मुख्य रस्त्यावरदेखील वाहतूक कोंडी

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतूक नियोजनाचा बोजवारा, बेशिस्त वाहनचालक, नो पार्किंगमध्ये उभी असलेली वाहने, अरुंद होत चाललेले रस्ते, अतिक्रमणे, व्यापारी आणि मॉल संस्कृतीमुळे भर रस्त्यावर होत असलेले पार्किंग आणि पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच पोलीस प्रशासनाचा ढिसाळ कारभार यामुळे दिवाळीच्या तोंडावर शहरातील बाजारपेठांबरोबरच मुख्य रस्तेदेखील तुंबू लागले आहेत. आजवर कधीही वाहतूक कोंडी न होणारे मोरवाडी, कोकणे चौक, चिंचवड स्टेशन, भोसरी आळंदी रोड, तळवडे ही ठिकाणे आता वाहतूक कोंडीची स्पॉट होऊ लागली आहेत. परिणामी, शहरातील नागरिकांना घरातून बाहेर पडताना मोटर न्यावी का, असा विचार करावा लागत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील रस्ते प्रशस्त आहेत. त्यात महत्त्वाचे म्हणजे दापोडी ते निगडी हा ग्रेड सेपरेटर रस्ता. मात्र, अलीकडच्या काळामध्ये याच रस्त्यावरची वाहतूक कोंडी पोलिसांची डोकेदुखी होऊ लागली आहे. विशेष म्हणजे, या रस्त्यावर गेल्या काही दिवसांमध्ये व्यापाऱ्यांनी मोठी दालने खुली केली आहेत. याचा फटका थेट वाहतुकीला बसत आहे.

# भोसरीचा पाणीप्रश्न पेटणार

## पाण्यासाठी सोसायट्यांना दुहेरी भुर्दंड

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत यंदा राजकीय आराखडा तापला असतानाच पाणीप्रश्नदेखील कळीचा मुद्दा ठरणार आहे. गेल्या सहा वर्षांपासून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र, भोसरी विधानसभेतील अनेक गावात कृत्रिम पाणीटंचाईमुळे टँकर लॉबीची चांदी सुरू आहे.



भोसरी, चिखली, मोशी, डुडुळगाव, चऱ्होली, दिघी यासह अनेक भागात दर महिना पाण्यासाठी सोसायटीतील रहिवाशांना लाखो रुपये खर्च करावा लागत आहे. त्यामुळे महापालिकेला पाण्याचा टॅक्स भरूनदेखील शंभराहून अधिक सदनिका असलेल्या सोसायटीला दहा ते बारा लाख रुपये पाण्यावर खर्च करावा लागत आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत पाणीप्रश्न पेटणार असून सोसायट्यांतील रहिवाशांचे मतदान निर्णायक ठरले तर परिवर्तनाची नांदी ठरणार आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये सत्ताधारी भाजपच्या काळापासून शहराला दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. पवना धरणासह आंद्रा धरण शंभर टक्के भरल्यानंतरदेखील महापालिका प्रशासकीय राजवटीत दिवसाआड पाणीपुरवठा सुरूच ठेवला. उन्हाळा असो की हिवाळा, आतादेखील शेकडो सोसायटीला टँकरने पाणी घ्यावे लागत आहे. पावसाळ्यात टँकरची मागणी कमी असते. पण उन्हाळ्यात टँकरची मागणी वाढते. भोसरी, चिखली, मोशी, चऱ्होली, पिंपरीसह वाकड, किवळे, सांगवी, पिंपळे सौदागर यासह अनेक भागात दररोज टँकरने पाणीपुरवठा सुरूच आहे.

# धरणे पूर्ण क्षमतेने भरूनही पुणेकरांचा घसा कोरडाच

## समान पाणीपुरवठा योजनेला मिळेना गती, नागरिकांना दिवसातून एक वेळ पाणी देण्यासही महापालिकेला अपयश

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रात यंदा पावसाने चांगलेच थैमान घातले. त्यामुळे पुण्याला पुराचा फटकादेखील सहन करावा लागला. धरणे भरून वाहू लागल्याने पुणेकरांना पाणी मुबलक प्रमाणात मिळेल, असे वाटत असतानाच शहराच्या मुख्य भागासह उपनगरांमध्ये समान सोडा पण दिवसातून एक वेळ पाणीपुरवठा करण्यासदेखील महापालिकेला अपयश आले आहे.

मोठा गाजावाजा करत सुरू केलेली समान पाणीपुरवठा योजना विविध परवानग्यांच्या अडथळ्यात अडकली असून अनेक भागातील काम संथ गतीने सुरू आहे. या योजनेवर आतापर्यंत १३६८.४४ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. मात्र त्यानंतरही पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याने धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली असतानाही पुणेकरांचा घसा कोरडाच आहे.

पुणे शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे, शहर विस्तारत असून मोठी बांधकामे सुरू आहेत. शहरात पायाभूत सुविधांचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहराची तहान भागविण्याचे मोठे संकट आता पुणे महापालिकेपुढे आ वासून उभे राहिले आहे. जलसंपदा विभागाकडे वाढीव पाण्याचा कोटा मागूनदेखील पाणी मिळत नसल्याने पाण्याचा पुरवठा करण्याची महापालिकेच्या अधिकाऱ्यांना कसरत करावी लागत आहे.

मोठा गाजावाजा करत शहराला २४ तास पाणीपुरवठा करणारी योजना आणली होती. परंतु २४ तास पाणी देण्याचे शक्य नसल्याने या योजनेचे नाव बदलून समान पाणीपुरवठा योजना असा बदल केला. त्यामुळे शहराला समान पाणीपुरवठा होईल, असे सांगितले होते. परंतु एक वेळचे पाणी देतानाही महापालिकेच्या नाकीनऊ आले आहेत का, असा संतापजनक सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे.

शहरातील नागरिकांना समान पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने हाती घेतलेल्या समान पाणीपुरवठा योजनेच्या कामाला वारंवार मुदतवाढ देऊनही योजनेचे काम संथ गतीने सुरू आहे. आठ वर्षे झाले तरी काम पूर्ण होत नसल्याने पाणीसाठवण टाक्यांचा प्रश्न सुटलेला नाही. कामाची मुदत जूनमध्ये संपल्यानंतर पुन्हा एकदा एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. योजनेचे काम करण्यासाठी सरकारी जागेतून पाईपलाईन टाकण्यास परवानगी मिळवण्यासाठी पाणीपुरवठा विभाग सरकारदरबारी चकरा माराव्या लागत आहेत.



### महापालिका अधिकाऱ्यांची बघ्याची भूमिका

» वडगाव शेरी, खराडी, लोहगाव, धानोरी, मांजरी, वाघोली, हडपसर, शहराचा पेठांचा काही भाग, रामटेकडी, काळेपडळ, फुरसुंगी आदी भागासह इतर भागात पाण्याचा कमी दाबाने पुरवठा केला जात आहे. येथील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याच्या नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत. अनेक भागात पाणी वेळत येत नाही. दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे, तर पाण्याची पाईपलाईन असूनदेखील पाणी येत नाही. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. मोठ्या रहिवासी सोसायट्या महिन्याला लाखो रुपये पाण्यासाठी मोजत आहेत. असे असताना महापालिकेचे अधिकारी हातावर हात ठेवून बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शहरासाठी आणलेली समान पाणीपुरवठा योजना अद्याप पूर्ण न झाल्याने ही योजना अपयशी ठरल्याचा आरोपही केला जाऊ लागला आहे.

### पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ

» विविध प्रकारच्या अडचणींमुळे आणि कोरोना प्रादुर्भावामुळे दिलेल्या मुदतीमध्ये योजनेचे काम होऊ शकले नाही. त्यामुळे आजवर तीन वेळा प्रत्येकी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. कामाची शेवटची मुदत जूनमध्ये संपली. त्यानंतरही अद्याप कामे पूर्ण होऊ न शकल्याने प्रशासनाने आता पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. मात्र, सध्याचा कामाचा वेग विचारात घेता, या मुदतीतही योजनेची कामे पूर्ण होतील का, याबाबत अनिश्चितताच आहे.

> वडगाव शेरी भागातील अनेक परिसरात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, नागरिकांच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. निवडणूक काळात मुद्दाम पाणी प्रश्न निर्माण केला आहे का, अशी शंका येत आहे. महापालिका आयुक्तांकडे याबाबत तक्रार केली आहे. पाण्याचे राजकारण कोणीही करू नये. लोकांना पाणी मिळावे अशी आमची मागणी आहे.
>
> **- बापूसाहेब पठारे, माजी आमदार, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष.**

# आदर्श आचारसंहिता भंगाच्या 333 तक्रारी

## 301 तक्रारींवर पहिल्या 100 मिनिटांत कार्यवाही

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात सी-व्हिजिल ॲपवर आदर्श आचारसंहिता भंगाच्या 333 तक्रारीवर कार्यवाही करण्यात आली आहे. त्यापैकी 301 तक्रारींवर पहिल्या 100 मिनिटांत कार्यवाही करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने सी-व्हिजिल ॲप विकसित केलेले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर 100 मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.



या ॲपवर जिल्ह्यात नागरिकांकडून 352 तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी 333 तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली आहे. तर त्यापैकी आंबेगाव विधानसभा मतदार संघात 5 तक्रारी, बारामती 12, भोसरी 1, चिंचवड 6, दौंड 4, हडपसर 3, इंदापूर 1, जुन्नर 3, कसबा पेठ 28,

खडकवासला 5, मावळ 6, पर्वती 61, पिंपरी 2, पुणे कॅन्टोन्मेंट 20, शिवाजीनगर 7 आणि वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात 137 अशा एकूण 301 तक्रारींवर पहिल्या शंभर मिनिटांत कार्यवाही करण्यात आली आहे.

सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ अपलोड करणे आवश्यक आहे. या ॲपवर तक्रार दाखल करणाऱ्या तक्रारदाराची ओळख गुप्त राखण्यात येते, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले.

# रेशन दुकानदारांचे आंदोलन स्थगित

## पुरवठा विभागाच्या अश्वासनानंतर घेतली माघार

**पुणे | प्रतिनिधी**

रेशन दुकानदारांनी दि. १ नोव्हेंबरपासून धान्यवाटप बंद आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांशी झालेल्या चर्चेनंतर हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.

नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर प्रलंबित मागण्यांबाबत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या मार्जिनमनीच्या प्रश्नावरून रेशनदुकानदारांनी संपाचा इशारा दिला होता.

दुकानदारांच्या न्याय व प्रलंबित मागण्यांसाठी दोन्ही राज्य संघटनेच्या वतीने १ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व ५६ हजार २०० रेशन



दुकानदारांनी धान्य उचल बंद, धान्यवाटप बंद, दुकान बंद आंदोलन पुकारले होते.

याबाबत मुंबई येथे मंत्रालयात अन्य व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी महासंघाचे राज्य अध्यक्ष डी. एन. पाटील व फेडरेशनचे राज्य अध्यक्ष गणपत डोळसे, तसेच दोन्ही संघटनांबरोबर नुकतीच बैठक घेतली.

या वेळी दुकानदारांचे कमिशन वाढविणे व इतर प्रलंबित मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा झाली. नवीन येणाऱ्या मंत्रिमंडळासोबत याबाबत एकत्रित बैठक आयोजित करून हे प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील, असे देओल यांनी या वेळी आश्वासित केले. त्यामुळे तूर्तास आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

# मतदान वाढवण्यासाठी घराजवळ मतदान केंद्र

## लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी घटली होती, विधानसभा निवडणुकीत अशी स्थिती निर्माण होऊ नये

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी घटली होती. विधानसभा निवडणुकीत अशी स्थिती निर्माण होऊ नये म्हणून निवडणूक विभागाने घराजवळ मतदान केंद्र बनविण्यात येत आहे, तर काही मतदान केंद्र चक्क हाऊसिंग सोसायटीत तयार करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने मतदान करतील आणि मतदानाची टक्केवारी वाढेल, असा विश्वास निवडणूक विभागाने केला आहे.



मे महिन्यात झालेल्या मावळ लोकसभा निवडणुकीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच, निवडणूक विभागाने मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. मात्र, केवळ ५४.८७ टक्के मतदान झाले. मतदार यादीत नाव नसणे, दूर अंतरावरील केंद्रात नावे असणे, नाव न सापडणे, घरी व्होटर स्लिप न मिळणे आदी कारणांमुळे मतदानाची टक्केवारी घटली होती. विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दिवाळीच्या सुटीत नागरिक सहकुटुंब गावी जातात. तसेच, मतदानाच्या सुटीच्या दिवशी सहलीचा आनंद घेतात. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घटण्याची शक्यता असते. मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून महापालिका प्रशासनाने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. वेगवेगळ्या प्रकारे जनजागृतीवर भर दिला आहे. तसेच, घराजवळ मतदान केंद्र निश्चित केली आहेत.

महापालिका व खासगी शाळांसह हाऊसिंग सोसायटीच्या आवारात मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. सोसायटीच्या क्लब हाऊस व रिकाम्या गाळ्यात तब्बल २६ केंद्र तयार केले जाणार आहेत. तेथील एका मतदान केंद्रात १ ते १ हजार ४०० मतदारांना मतदान करता येणार आहे. त्यादृष्टीने निवडणूक विभागाने तयारी सुरू केली आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघात मोरवाडी, पिंपरी येथील त्रिवेणी हाऊसिंग सोसायटीत २ मतदान केंद्र असणार आहेत. तेथीलच रिवरडेल हाऊसिंग सोसायटीत २ केंद्र असतील. कासारवाडी येथील मंत्री इटर्निटी हाऊसिंग सोसायटीत २ मतदान केंद्र असणार आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ९ हाऊसिंग सोसायटीत एकूण १३ मतदान केंद्र असणार आहेत. थेरगावात स्विस काउंटी सोसायटीत २, थेरगावात गंगा आशियाना मिडास सोसायटी १, विजयनगर, काळेवाडीतील सोनिगरा विहार सोसायटीत १, पिंपळे सौदागर येथील राजवीर पॅलेसमधील फेज एकमध्ये १, तेथीलच सिद्धिविनायक जिंजर सोसायटीत १, पिंपळे निलख येथील निसर्ग आनंद सोसायटीत ३ केंद्र असणार आहेत. कस्पटेवस्ती, वाकड येथील विंडवर्ड सोसायटीत १ आणि रहाटणीतील फाईव्ह गार्डन सोसायटी २ केंद्र आहेत. रावेतमधील सेलेस्टियल सिटी सोसायटीत १ केंद्र आहे.

### भोसरीत घरकुलात करता येणार मतदान

» भोसरी विधानसभेत चिखली घरकुलातील मधुमिलन सोसायटीतील बिल्डिंग क्रमांक ३४ येथे ३ मतदान केंद्र आहेत. संत नगर, बोऱ्हाडेवाडी येथील केंद्रीय विहार सोसायटीत ३ आणि बोऱ्हाडेवाडीतील होयाज हाऊसिंग सोसायटीत १ मतदान केंद्र आहे. असे एकूण ७ मतदान केंद्र सोसायटीच्या परिसरात आहेत. मतदार यादीत नाव शोधण्यासाठी विविध सुलभ ॲप व प्रणाली सुरू करण्यात आली आहे. निवडणूक विभागाच्या या लिंकवर नाव शोधता येते. त्यात नाव व ओळखपत्र क्रमांक टाकून मतदार केंद्र शोधता येते.

### केंद्रांवर व्हीलचेअर, पाळणाघर, वैद्यकीय सुविधा

मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे म्हणून निवडणूक विभाग विविध उपाययोजना करीत आहे. मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, रॅम्प तसेच, ज्येष्ठ मतदार, दिव्यांग व रुग्णांसाठी व्हीलचेअर सुविधा देण्यात येणार आहे. मंडप, महिला मतदार, दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांसाठी स्वतंत्र रांगा, बालकांसाठी पाळणाघर, वैद्यकीय सुविधा आदी अधिकच्या सुविधा पुरविण्यात येणार आहेत. शहरातील मुख्य चौक, उद्यान, क्रीडांगणे, महाविद्यालये, हाऊसिंग सोसायट्या, मॉल, सिनेमागृह, जीम, व्यावसायिक आस्थापना, कंपन्या, महिला बचत गट, झोपडपट्टी परिसर, ज्येष्ठ नागरिक संघ, भाजी मंडई, मजूर अड्डा, रुग्णालये व औद्योगिक कंपन्या आदी वेगवेगळ्या भागांत मतदार जनजागृती करण्यात येत आहे. एलईडी व्हॅन तसेच, व्हीएमडीवर आवाहन केले जाणार आहे. जागोजागी पथनाट्ये केले जातील. मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये 'नो युवर वोटिंग सेंटर हेल्पलाईन' सुरू करण्यात येणार आहे. ही मोहीम राबवण्यासाठी महापालिकेने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे.

### मतदारसंघनिहाय सोसायटीतील मतदान केंद्र

पिंपरी-३-६
चिंचवड-९-१३
भोसरी-३-७
एकूण-१५-२६

# महापालिकेचे जलतरण तलाव अद्याप बंद

## जलतरण बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून नागरिक व खेळाडू नाराजी व्यक्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जलतरण तलावातील पाण्याचे शुद्धीकरण केले जात नसल्याने तलावातील पाणी घाण झाले आहे. त्यामुळे शहरातील काही तलाव पोहण्यासाठी बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे जलतरण बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून नागरिक व खेळाडू नाराजी व्यक्त करत आहेत.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने केशवनगर, संभाजीनगर, कासारवाडी, पिंपरी वाघेरे, यमुनानगर, पिंपळेगुरव, नेहरुनगर, वडमुखवाडी, भोसरी, मोहननगर, थेरगाव, सांगवी, आकुर्डी या भागांत १३ जलतरण तलावांची उभारणी करण्यात आली आहे. शहरातील नागरिक, लहान मुले, महिला पोहण्यासाठी जलतरण तलावाकडे जात असतात. पण, महापालिकेचे विविध भागांतील १३ जलतरण तलावांपैकी काही तलाव सुरू आहेत, तर अद्यापही पाच ते सहा जलतरण तलाव बंद आहेत. त्यातच सुरू असलेल्या तलावाचे ऑनलाइन बुकिंग सुरू झाले की लगेच हाऊसफुल्ल होत आहेत. त्यामुळे नागरिकांसह महिला, लहान मुलांचा हिरमोड होत आहे. हे जलतरण तलाव बंद राहिल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महापालिकेचे जलतरण तलाव असून त्यातील काही तलावात पाण्याचे शुद्धीकरण केले जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पाणी खराब झाले आहे. महापालिका प्रशासन व ठेकेदाराकडून पाणी शुद्धीकरणाकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी, तलाव पोहण्यासाठी बंद करण्यात आले आहेत. पोहता येत नसल्याने नागरिक व खेळाडू नाराजी व्यक्त करीत आहेत.

### तलाव बंद न ठेवण्याचे निर्देश

» तलावाचे पाणी शुद्ध करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत. त्या संदर्भात गुरुवारी (दि. २४) बैठक झाली आहे. त्यावर तातडीने कार्यवाही केली जात आहे. कोणताही तलाव बंद राहणार नाही, असे सक्त निर्देश ठेकेदारांना देण्यात आले आहेत, असे महापालिकेच्या क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी सांगितले.

# सीबीएसईच्या शाळांची नावे बदलणार

## 'पीएम श्री' योजनेअंतर्गत शाळा प्रशासनाला शाळेचे नाव बदलण्यासाठी ऑनलाइन पोर्टल



**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) सरकारी किंवा अनुदानित शाळांची नावे येत्या काही दिवसांत बदलण्याची शक्यता आहे. देशात लागू करण्यात आलेल्या 'पीएम श्री' योजनेअंतर्गत शाळा प्रशासनाला शाळेचे नाव बदलायचे असल्यास त्यासाठी सीबीएसईने ऑनलाइन पोर्टलची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

'पीएम श्री' योजनेअंतर्गत शाळांची नावे बदलण्यास परवानगी द्यावी, अशा प्रकारचे अर्ज सीबीएसईकडे येत आहेत. त्यामुळे आता सीबीएसईनेच योजनेनुसार नावे बदलण्यास इच्छुक असणाऱ्या शाळांना ऑनलाइन अर्ज करण्यासाठी पोर्टलची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अशाप्रकारे शाळांची नावे बदलून अद्ययावत करण्यासाठी संबंधित शाळांना सीबीएसई 'सरस' पोर्टलवर 'चेंज द नेम ऑफ स्कूल' या वर्गवारीत जाऊन अर्ज करता येणार आहे. परंतु, ही लिंक सुरू झाल्यानंतरच शाळांना हे अर्ज करता येणार आहेत, असे सीबीएसईने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

सध्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता सीबीएसई सरस पोर्टल हे बंद आहे. हे पोर्टल पुढील वर्षी सुरू झाल्यानंतरच शाळांना त्यांचे अर्ज सादर करता येणार आहेत. या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करूनच संबंधित शाळांना नावामध्ये आवश्यक ते बदल करता येतील. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून शाळेचे नाव बदलण्यासाठी मिळालेल्या मान्यतेचे पत्र संबंधित पोर्टल सुरू झाल्यानंतर अर्ज करताना अपलोड करावे लागणार आहे.

### 'पीएम श्री शाळा' योजना नेमकी काय?

» केंद्र सरकार पुरस्कृत ही योजना असून, केंद्र सरकार, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश सरकार, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या शाळांचा मूलभूत गुणवत्तापूर्ण विकास करण्याबरोबरच त्यांच्यात आमूलाग्र बदल घडवून उच्च दर्जाचा शैक्षणिक विकास साधण्यासाठी पंतप्रधान स्कूल फॉर रायझिंग इंडिया (पीएम श्री) ही योजना राबवली जाणार आहे.

### 'पीएम श्री'ची वैशिष्ट्ये :

- » शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.
- » मुलांना आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण.
- » जीवनावर आधारित मूल्यशिक्षणावर भर.
- » माध्यमिक शिक्षणात कौशल्यावर आधारित शिक्षण आणि त्यातून रोजगारक्षमता विकास साधणे.
- » नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित सर्व अभ्यासक्रम राबविणे.

# गवार, कोबी, वांगी, भुईमुग शेंग, मटार महाग!

## राज्य, तसेच परराज्यातून मिळून 90 ट्रक फळभाज्यांची आवक : व्यापाऱ्यांनी दिली माहिती



**पुणे | प्रतिनिधी**

मागणी वाढल्याने गवार, कोबी, वांगी, भुईमुग शेंग, मटारच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ८ ते १० टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून ३ ते ४ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ३ ते ४ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ५ ते ६ टेम्पो गाजर, गुजरातमधून ३ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ८ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ४०० ते ५०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो दहा ते अकरा हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो, ढोबळी मिरची ७ ते ८ टेम्पो, पुरंदर, पारनेर, वाई, सातारा परिसरातून मटार ४० ते ५० गोणी, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ३ ते ४ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, तांबडा भोपळा ८ ते १० टेम्पो, कांदा १०० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ५० ते ६० टेम्पो बटाट्याची आवक झाली.

घाऊक बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे – कोथिंबीर- १५०० ते २५००, मेथी – २५०० ते ३०००, शेपू – ८०० ते १५००, कांदापात- १००० ते १५००, चाकवत – ६०० ते १०००, करडई- ५०० ते ८००, पुदिना – ५०० ते १०००, अंबाडी – ५०० ते ८००, मुळे – ८०० ते १५००, राजगिरा- ४०० ते ७००, चुका – ५०० ते ८००, चवळई- ३००-७००, पालक- १०००-१५००.

### कोथिंबीर, मेथी, शेपू, पालकच्या दरात वाढ

» कोथिंबीर, मेथी, शेपू, पालक, चाकवत, करडई, चाकवत या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली. कांदापात, पुदिना, अंबाडी, मुळे, राजगिरा, चुका, चवळईचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबीर एक लाख जुडी, तसेच मेथीच्या ३० हजार जुडींची आवक झाली. घाऊक बाजारात कोथिंबिर आणि मेथीच्या जुडीमागे पाच रुपयांनी वाढ झाली. पालक, शेपू, चाकवत आणि करडईच्या जुडीमागे दोन ते तीन रुपयांनी वाढ झाली.

### लिंबू, पेरूच्या दरात घट

» लिंबू आणि पेरूच्या दरात घट झाली. मोसंबी, पपई, खरबूजच्या दरात वाढ झाली. अननस, डाळिंब, संत्री, चिकू, कलिंगड, सीताफळाचे दर स्थिर असल्याची माहिती फळबाजारातील व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी मोसंबी ५० ते ६० टन, संत्री २५ ते ३० टन, डाळिंब ४० ते ५० टन, पपई ५ ते ६ टेम्पो, लिंबे दीड ते दोन हजार गोणी, कलिंगड ३ ते ४ टेम्पो, खरबूज ३ ते ४ टेम्पो, चिकू एक हजार गोणी, पेरू एक हजार ते १२०० प्लास्टिक जाळी (क्रेट), अननस ५ ट्रक, सीताफळ ४० ते ५० टन अशी आवक झाली.